**चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासमवेत पंतप्रधानांची द्विपक्षीय बैठक (31 ऑगस्ट 2025)**

31 ऑगस्ट 2025

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांमध्ये 31 ऑगस्ट 2025 रोजी तियानजिन येथे शांघाय सहकार्य संघटना (SCO) नेतृत्वाच्या शिखर बैठकीच्या पार्श्वभूमीवर भेट पार पडली.

2. कझान येथे ऑक्टोबर 2024 मध्ये पार पडलेल्या सर्वात अलीकडील भेटीनंतर द्विपक्षीय संबंधांना मिळालेली चालना आणि निरंतर गतीने झालेल्या प्रगतीचे उभय नेतृत्वाने स्वागत केले. उभय देश परस्परांचे प्रतिस्पर्धी नसून विकासाचे भागीदार आहेत. परस्पर मतभेदांचे रुपांतर वादात होता कामा नये, हा मुद्दा त्यांनी अधोरेखित केला. भारत आणि चीन तसेच त्यांच्या 2.8 अब्ज नागरिकांमध्ये परस्पराविषयीचा आदरभाव, परस्परांचे हित आणि परस्पर संवेदनशीलता यावर आधारित स्थैर्यपूर्ण संबंध आणि सहकार्य उभय देशांची वृद्धी आणि विकासाकरिता तसेच 21 व्या शतकातील कलास अनुरुप असलेले बहुध्रुवीय जग आणि बहुध्रुवीय आशियासाठी देखील आवश्यक आहे.

3. पंतप्रधानांनी द्विपक्षीय संबंधांमध्ये निरंतर विकासासाठी सीमावर्ती भागातील शांतता आणि सुव्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित केले. गेल्या वर्षी यशस्वीरित्या झालेली सैन्य माघारी आणि त्यानंतर सीमेवर शांतता व सुव्यवस्था राखल्याबद्दल उभय नेतृत्वांनी समाधान व्यक्त केले. त्यांनी त्यांच्या एकूण द्विपक्षीय संबंधांच्या राजकीय दृष्टिकोनातून आणि उभय देशांच्या नागरिकांच्या दीर्घकालीन हितामधून सीमा प्रश्नावर एक निष्पक्ष, वाजवी आणि परस्पर स्वीकारार्ह तोडगा काढण्याची आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. त्यांनी या महिन्याच्या सुरुवातीला त्यांच्या विशेष प्रतिनिधींच्या चर्चेमध्ये घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची दखल घेतली आणि त्यांच्या प्रयत्नांना आणखी पाठिंबा देण्यास सहमती दर्शविली.

4. उभय नेतृत्वाने कैलास मानसरोवर यात्रा आणि पर्यटक व्हिसा पूर्ववत झाल्यामुळे थेट उड्डाणे आणि व्हिसा सुलभ करून नागरिक परस्पर संबंध बळकट करण्याची गरज असल्याचे नमूद केले. आर्थिक आणि व्यापार संबंधांवर, त्यांनी जागतिक व्यापार स्थिर ठेवण्यासाठी त्यांच्या उभय अर्थव्यवस्थांच्या भूमिकेची दखल घेतली. त्यांनी द्विपक्षीय व्यापार आणि गुंतवणूकविषयक संबंध वाढवण्यासाठी आणि व्यापार तूट कमी करण्यासाठी राजकीय आणि धोरणात्मक दिशेने पुढे जाण्याची गरज अधोरेखित केली.

5. भारत आणि चीन दोन्ही धोरणात्मक स्वायत्ततेचा पाठपुरावा करतात आणि त्यांचे संबंध तिसऱ्या देशाच्या दृष्टिकोनातून पाहिले जाऊ नयेत असे पंतप्रधानांनी नमूद केले. उभय नेतृत्वाने दहशतवाद आणि बहुपक्षीय मंचांवरील न्याय्य व्यापार यांसारख्या द्विपक्षीय, प्रादेशिक आणि जागतिक समस्या आणि आव्हानांवर सामायिक आधाराचा विस्तार करणे आवश्यक मानले.

6. पंतप्रधानांनी SCO अध्यक्षपद आणि तियानजिन येथील शिखर बैठकीसाठी चीनच्या अध्यक्षपदाला पाठिंबा व्यक्त केला. त्यांनी राष्ट्राध्यक्ष शी यांना वर्ष 2026 मध्ये भारत यजमानपद भूषविणार असलेल्या ब्रिक्स शिखर बैठकीसाठी देखील आमंत्रित केले.  राष्ट्राध्यक्ष शी यांनी निमंत्रणासाठी पंतप्रधानांचे आभार मानले. भारताच्या ब्रिक्स अध्यक्षपदाला चीनचा सर्वोपतरी पाठिंबा दर्शविला.

7. पंतप्रधानांनी चीनच्या कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिट ब्युरोच्या स्थायी समितीचे सदस्य काई ची यांचीही भेट घेतली.  पंतप्रधानांनी काई यांच्यासोबत द्विपक्षीय संबंधांसाठी त्यांचा दृष्टीकोन सामाईक केला आणि दोनही नेत्यांच्या दृष्टीकोनाची पूर्तता करण्यासाठी त्यांचा पाठिंबा मागितला.  काई यांनी दोन्ही नेत्यांमध्ये झालेल्या सहमतीनुसार द्विपक्षीय देवाणघेवाण वाढवण्याविषयी आणि संबंध सुधारण्याविषयी चीनच्या बाजूने व्यक्त होत असलेल्या इच्छेचा पुनरुच्चार केला.

टियांजिन

31 ऑगस्ट 2025